**वादी कडून साक्षीदार क्रं.४ यांचा शपथेवर उलटतपास प्र.वादी क्रं.०२ तर्फे श्री.अॅड.जी.एस.पांढरे यांच्या मार्फत सुरु**

मी उदगीर येथे राहतो व माझा शेतीचा व्यवसाय आहे. वादी नात्याने आई आहे. प्रतिवादी नात्याने बहिण व भाउ आहेत. मी पण या दाव्यात प्रतिवादी आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रं. ०२ भाग्यश्री याला मिळकती हिस्सा मिळू नये म्हणून आईच्या वतीने साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आईची सांगण्यावरुन साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, आईला मदत करण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझा वडीलानी दावा मिळकत स्वतःच्या नावावर केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांना विश्वनाथ उप्परबावडे कडून खरेदी केली होती. एक हेक्टर ५२ आर ही जमीन विश्वनाथ उप्परबावडे यांच्याकडून खरेदी केली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, भू मापन क्रं.३४/ब/२ मौजे निडेबन, एक हेक्टर ५२ आर हि मिळकत माझे वडीलांनी विश्वनाथ उप्परबावडे यांच्याकडून खरेदी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईने जमीन खरेदी केली हे मी खोटे सांगत आहे.

दावा क्रं. २४८/२०१५ शरणाम्मा बाई यांनी बंडप्पा रेवण सिध्दप्पा यांच्या विरुदध दाखल केला होता. तो दावा हा ५२ आर क्षेत्र घेण्यासाठी होता. तो दावा कोणता तारेखला दाखल केला हे सांगता येत नाही. तो दावा निकाली झाला त्याची तारीख मी सांगू शकत नाही. हा दावा वाद जमीनी बददल दाखल करण्यात आला. आईने स्वतः जमीन पैसे देवून जमीन खरेदी केली होती. वडीलांना पुन्हा तडजोड करुन जमीन त्यांच्या नावावर करुन दिली. प्रतिवादी पेरणी करु देत नाही म्हणून त्यांच्या विरुदध पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. तशी तक्रार माझे आईने केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आई ला मदत करण्यासाठी आज

रोजी खोटी साक्ष देत आहे. या दाव्याच्या कामी मी प्रतिवादी म्हणून सामील आहे.

**उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.09.22 17:50:37 +0530

( श्री व्ही. आर. घराळ )

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

दिनांकः– २०.०९.२०२५ उदगीर.